दैनिक
# श्रमिक लोकराज्य

नांदेड,परभणी,लातूर,हिंगोली येथे वितरीत होणारे वृतपत्र

संपादक
ज्ञानेश्वर बालाजीराव डोईजड
मो.7875782377

कार्यकारी संपादक
वैंजनाथ द.स्वामी
मो.8329736330

नांदेड । दैनिक । वर्ष ६ । अंक २३२ । मंगळवार, दि. १२ मे २०२६ । RNI MAHMAR/2021/85782
। पाने ०४ । किंमत २ रूपये । ई–पेपर : www.shramiklokrajya.in




## केवळ मेहनत, जिद्द आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर निर्माण केलेले कार्य

### कोणताही मोठा राजकीय वारसा नाही, कोणतेही आर्थिक पाठबळ नाही, तरीही केवळ वाचक, जाहिरातदार आणि मित्रपरिवार यांच्या सहकार्याने दैनिकाचे काम

## 12 मे निर्भिड, नि:पक्ष सर्वसामान्यांचा आवाज

## संपादक
# ज्ञानेश्वर डोईजड
## वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...!

**मुखेड तालुक्यासह संपूर्ण नांदेड जिल्ह्यामध्ये निर्भिड, नि:पक्ष आणि सर्वसामान्यांचा आवाज म्हणून ओळख निर्माण करणारे दैनिक श्रमिक लोकराज्यचे संपादक ज्ञानेश्वर डोईजड यांचा आज दिनांक १२ मे रोजी वाढदिवस उत्साहात साजरा होत आहे. संघर्ष, जिद्द, मेहनत आणि सामाजिक बांधिलकीच्या जोरावर पत्रकारिता क्षेत्रात स्वत:ची वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या या युवा संपादकावर आज सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. सर्वप्रथम त्यांना वाढदिवसानिमित्त कोटी कोटी शुभेच्छा.**

पत्रकारितेची सुरुवात त्यांनी साधारण सात वर्षांपूर्वी केली. सुरुवातीच्या काळात विविध वर्तमानपत्रांमध्ये काम करत त्यांनी पत्रकारितेचे धडे घेतले. गाववाला, दैनिक भास्कर यांसारख्या वर्तमानपत्रांमध्ये काम करत असताना स्वत:चे स्वतंत्र आणि सर्वसामान्यांसाठी लढणारे वर्तमानपत्र असावे, हा विचार त्यांच्या मनात दृढ झाला आणि त्यातून दैनिक श्रमिक लोकराज्य या वर्तमानपत्राची निर्मिती झाली.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी दैनिकाची नोंदणी करून स्वत:चे वर्तमानपत्र सुरू केले. आर्थिक परिस्थिती अत्यंत बेताची असतानाही त्यांनी हार न मानता पत्रकारितेची वाट चालू ठेवली. वर्तमानपत्र चालवताना अनेक कठीण प्रसंग आले, आर्थिक अडचणी आल्या, स्पर्धेच्या बाजारात टिकून राहण्याचे मोठे आव्हान होते, मात्र आपल्या जिद्दीच्या बळावर त्यांनी दैनिकाचे अस्तित्व कायम ठेवले. आज सात वर्षांपासून नियमितपणे दैनिकाचे काम सुरू ठेवणे ही स्वत:मध्ये मोठी कर्तबगारी मानली जाते.

कोणताही मोठा राजकीय वारसा नाही, कोणतेही आर्थिक पाठबळ नाही, तरीही केवळ वाचक, जाहिरातदार आणि मित्रपरिवार यांच्या सहकार्याने त्यांनी दैनिक चालवत आहेत.

मर्यादित साधनसामग्रीमध्ये एक सक्षम टीम तयार करून पत्रकारितेचे काम प्रामाणिकपणे सुरू ठेवले. दैनिक श्रमिक लोकराज्यने ग्रामीण भागातील सर्वसामान्य लोकांचे प्रश्न प्रभावीपणे मांडत स्वत:ची स्वतंत्र ओळख निर्माण केली.

सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणारा पत्रकार आणि संपादक म्हणून आज त्यांच्याकडे पाहिले जाते. रेल्वेचे प्रश्न असोत, शासकीय कार्यालयांतील भ्रष्टाचार असो, अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कामकाजातील त्रुटी असोत, शेतकरी, विद्यार्थी, कामगार किंवा ग्रामीण भागातील नागरिकांचे प्रश्न असोत , त्यांनी नेहमी निर्भिडपणे आवाज उठवला. त्यांच्या बातम्यांमुळे अनेक प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचले,



**विद्यार्थीदशेपासूनच त्यांना सामाजिक कार्याची आवड होती. ते अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेत सक्रिय कार्यकर्ते म्हणून काम करत होते. त्यानंतर काही काळ त्यांनी भारतीय जनता पक्षातही काम केले. मात्र घरची परिस्थिती बेताची असल्याने त्यांनी सक्रिय राजकारणापासून दूर राहत स्वत:चा व्यवसाय आणि पत्रकारिता यावर लक्ष केंद्रित केले.**

**सध्या "ज्ञानेश्वर कम्प्युटर्स" या नावाने त्यांचा ऑनलाईन सेवा व्यवसाय सुरू असून व्यवसाय सांभाळत ते पत्रकारिताही अत्यंत प्रामाणिकपणे करत आहेत. त्यांच्या पत्रकारितेमुळे अनेक सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळाला असून ग्रामीण भागातील प्रश्नांना मोठी वाचा मिळाली आहे. संघर्षातून उभे राहून स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करणारे संपादक ज्ञानेश्वर डोईजड हे आज अनेक युवकांसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत. कोणताही वारसा नसताना, केवळ मेहनत, जिद्द आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर त्यांनी निर्माण केलेले कार्य निश्चितच प्रेरणादायी आहे. त्यांच्या पुढील आयुष्यास उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, सुख-समृद्धी आणि पत्रकारिता क्षेत्रात अधिक यश लाभो, हीच वाढदिवसानिमित्त शुभेच्छा.**

अनेकांना न्याय मिळाला आणि प्रशासनाला कारवाई करण्यास भाग पाडले गेले.

पत्रकारिता आणि जनता यांच्यामध्ये निर्माण झालेली दरी कमी करण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी आपल्या लेखणीतून केले. पत्रकारिता ही केवळ बातम्या छापण्यापुरती मर्यादित नसून ती समाजासाठी लढणारी ताकद आहे, हे त्यांनी आपल्या कामातून सिद्ध करून दाखवले.

पत्रकार म्हणून काम करत असतानाच त्यांच्या मित्रपरिवार आणि सहकाऱ्यांनी त्यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवली. मुखेड तालुका मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे पार पाडली. पत्रकारांच्या समस्या, हक्क आणि संघटनात्मक कामांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

दैनिक श्रमिक लोकराज्यचे विविध विशेषांक आणि प्रकाशन समारंभ अनेक मान्यवरांच्या हस्ते पार पडले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री स्व.अजित दादा पवार, पालकमंत्री अतुल सावे, माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण,



आमदार तुषार राठोड,जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्यासह अनेक मान्यवरांच्या हस्ते दैनिकाचे प्रकाशन झाले असून त्यांच्या पत्रकारितेची दखल राज्यस्तरावर घेतली गेली आहे.

लहानपणीच वडिलांचे छत्र हरवल्यानंतर अत्यंत कठीण परिस्थितीत त्यांचे संगोपन झाले. आईने मोठ्या कष्टाने त्यांना शिक्षण दिले आणि आयुष्यात उभे राहण्याची प्रेरणा दिली. परिस्थितीशी संघर्ष करत त्यांनी लहानपणापासून अनेक प्रकारची कामे केली. कधी हॉटेलमध्ये काम, कधी भांडी व्यवसाय, तर कधी आजोबांसोबत भिक्षा मागण्याची वेळही त्यांच्यावर आली. मिळेल ते काम प्रामाणिकपणे करून त्यांनी आयुष्याचा प्रवास सुरू ठेवला.

कोणतेही काम कमीपणाचे नसते, हा विचार त्यांनी आपल्या जीवनातून सिद्ध करून दाखवला. कष्ट, जिद्द आणि प्रामाणिकपणाच्या बळावरच आज ते पत्रकारिता क्षेत्रात स्वत:चे स्थान निर्माण करू शकले.

लेखन
**संदीप पिल्लेवाड**
पत्रकार,
दैनिक श्रमिक लोकराज्य

## संपादकीय

# ‘इंडिया’ची इडा!



खरेतर लोकसभेच्या तीन निवडणुका लागोपाठ जिंकणाऱ्या भाजपला अजूनही देशात ४० टक्के मतांचा टप्पा गाठता आलेला नाही.

नुकत्याच झालेल्या तमिळनाडू, पश्चिम बंगालसह पाच राज्यांच्या निवडणुकांच्या निकालांनंतर राष्ट्रीय राजकारणातील संदर्भ बदलल्याचे दिसत आहेत. विशेषत: ‘इंडिया आघाडी’पासून सुरू झालेली आणि अलीकडेच महिला आरक्षण विधेयकाच्या निमित्ताने संसदेत ठळकपणे दिसलेली विरोधकांच्या ऐक्याची वीण उसवली गेली आहे का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. याउलट केंद्रातील सत्ताधारी भाजपला पश्चिम बंगालच्या विजयाने अधिक बळ मिळाले आहे. या निकालांनंतरचे देशाचे राजकीय चित्र पाहता देशातील ७० टक्क्यांपेक्षा अधिक भूभागावर भाजप किंवा मित्र पक्षाची सत्ता प्रस्थापित झाली आहे. अशा पद्धतीने देशभर पसरलेल्या भाजपशी सामना करण्यासाठी एकेका राज्यातून एकेकट्याने भाजपच्या विरोधात लढण्यापेक्षा एकत्र येऊन लढण्यासाठी विरोधकांच्या एकीचा मुद्दा नेहमी मांडला जातो. २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी विरोधकांनी एकत्र येत ‘इंडिया आघाडी’चा प्रयोग केला. अर्थात, सारेच विरोधक या आघाडीत सहभागी झाले नव्हते. तरीही विरोधकांची मोट बांधण्यात तेव्हा काँग्रेसला बऱ्यापैकी यश आले होते. ममता बॅनर्जी सहभागी झाल्या नसल्या तरी अगदी आम आदमी पार्टीच्या अरविंद केजरीवाल यांच्यासारखे कट्टर काँग्रेस विरोधकही या आघाडीत सहभागी झाले होते. त्याचा निकालावरही परिणाम झाला. भाजपने सत्ता राखली असली तरी ‘चारसो पार’ची घोषणा दिलेल्या भाजपची गाडी २४० वरच रखडली. विरोधकांच्या एकीमुळेच भाजपला रोखण्यात तेव्हा यश आले होते. अगदी गेल्याच महिन्यात महिला आरक्षणाच्या आणि मतदारसंघ पुनर्रचनेसाठी मांडण्यात आलेले घटना दुरुस्ती विधेयक लोकसभेत विरोधकांच्या एकीनेच मंजूर होऊ शकले नाही. संसदीय राजकारणात पंतप्रधान मोदी यांचा गेल्या १२ वर्षांतील राजकीय कारकीर्दीतील पहिलाच पराभव. सर्व विरोधक एकत्र आल्याने भाजपला घटना दुरुस्तीसाठी आवश्यक दोन तृतीयांश मतांचे उद्दिष्ट साधता आले नाही. परिणामी भाजपला मोठा धक्का बसला.

विरोधकांची अशीच एकी निवडणुकांमध्ये आणि एरव्ही संसदेतही कायम राहावी अशी अपेक्षा या निमित्ताने व्यक्त करण्यात येत होती. पण तमिळनाडू विधानसभेच्या निकालाने विरोधकांच्या एकीला मोठा धक्का बसला आहे. तिथे चित्रपट अभिनेते विजय यांच्या टीव्हीके पक्षाने अनपेक्षितपणे मुसंडी मारली. पक्षाला बहुमतासाठी १० आमदारांचे संख्याबळ कमी पडले आणि सारे चित्र बदलले. विजयने भाजपच्या कच्छपी लागू नये म्हणून कधी नव्हे एवढ्या चपळाईने काँग्रेसने विजय यांना पाठिंबा देण्याचा निर्णय जाहीर केला. पण त्यासाठी काँग्रेसने गेल्या दोन दशकांचा मित्र पक्ष असलेल्या द्रमुकशी आघाडी तोडली. वास्तविक, द्रमुक आणि विजय या दोघांचाही भाजप हा समान शत्रू आहे. भाजप हा वैचारिक विरोधक असल्याचे विजय यांनी प्रचारातच जाहीर केले होते. पण त्यांना पाठिंबा देणे राज्यातील दीर्घकालीन राजकारणासाठी द्रमुकला सोयीचे नव्हते. विजय यांना पाठिंबा देण्याचा काँग्रेसचा निर्णय द्रमुकला आवडला नाही. काँग्रेसने पाठीत खंजीर खुपसल्याची अधिकृत प्रतिक्रिया द्रमुककडून व्यक्त करण्यात आली. त्यातच द्रमुक व अण्णा द्रमुक या पारंपरिक विरोधकांनी एकत्र येऊन सरकार स्थापन करण्याच्या दिल्लीतील प्रयत्नांना स्टॅलिन यांनी अनुकूल प्रतिसाद दिला होता. तर तमिळनाडूसारख्या मोठ्या राज्यात भाजपला चंचूप्रवेश मिळू नये म्हणून काँग्रेसने विजय यांना साथ देण्याचा निर्णय घेतला. काँग्रेसचे हे वागणे द्रमुकला एवढे नापसंत ठरले की त्यांनी ताबडतोब लोकसभा अध्यक्षांना पत्र लिहून सभागृहात बसण्यासाठी वेगळी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. काँग्रेसच्या या निर्णयामुळे द्रमुकचे २२ खासदार काँग्रेसपासून दुरावले आहेत. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत तमिळनाडूतील सर्व ३९ जागा ‘इंडिया आघाडी’ने जिंकल्या होत्या. पण आता सगळीच गणिते बदलण्याची शक्यता आहे. दुसरीकडे समाजवादी पक्षाच्या अखिलेश यादव यांनीही काँग्रेसने उचललेल्या या पावलाबद्दल सूचक टिप्पणी केली आहे. या सगळ्या घडामोडींचा ‘इंडिया आघाडी’ला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. ममता बॅनर्जी यांच्या पश्चिम बंगालमधील पराभवाचाही विरोधकांच्या संख्याबळावर परिणाम होऊ शकतो. पश्चिम बंगाल आणि तमिळनाडूतील लोकसभेच्या एकूण ८१ जागांपैकी ‘इंडिया आघाडी’ आणि ममतांच्या तृणमूल काँग्रेसने एकूण ६९ जागा जिंकल्या होत्या. आगामी लोकसभा निवडणुकीआधी मतदारासंघांची पुनर्रचना होऊन जागांच्या संख्येत वाढ झाली वा सध्याचेच संख्याबळ कायम राहिले तरीही विरोधकांना एवढे यश संपादन करणे आता आव्हानात्मक असेल.

काँग्रेस, ममता बॅनर्जी, आम आदमी पार्टीचे केजरीवाल, समाजवादी पार्टी, द्रमुक या सगळ्या विरोधी पक्षांमध्ये एक समान धागा म्हणजे या सर्वांचा राजकीय विरोधक एकच, भाजप. भाजपशी सामना करण्यासाठी या विरोधकांची एकी राहणे अपेक्षित आहे. पण बदलत्या परिस्थितीत त्यांची मोट बांधणे हे आव्हानात्मक ठरणार आहे. काही तरी होऊन एकत्र आले तरी विरोधकांचे ऐक्य टिकेलच याची खात्री देता येत नाही. इंदिरा गांधी यांनी लागू केलेल्या आणीबाणीनंतर समाजवाद्यांपासून जनसंघापर्यंत टोकाचे विरोधक पक्ष एकत्र आले होते. कारण काँग्रेस हा तेव्हा सगळ्यांचा प्रमुख राजकीय शत्रू होता. एकीचा हा प्रयोग तेव्हा यशस्वी झाला आणि जनता पक्षाला सत्ता मिळाली. ही एकी फार काळ टिकली नाही. जनसंघाच्या नेत्यांच्या दुहेरी सदस्यत्वाचा मुद्दा मधू लिमये आणि अन्य समाजवादी साथींनी पुढे रेटला. जनता पक्षातील जनसंघाच्या नेत्यांनी रा. स्व. संघाशी असलेले संबंध तोडावेत, अशी मागणी करत जनता पक्षातील नेत्यांनी तेव्हा दबाव आणला होता. शेवटी या दुहेरी सदस्यत्वाच्या मुद्द्यावरच जनता पक्षाचे सरकार कोसळले. आताचे चित्रही फार काही वेगळे नाही. काँग्रेसच्या भूमिकेमुळे द्रमुकला वेगळा निर्णय घ्यावा लागला आहे. भाजप विरोधातील लढाईत द्रमुकची भूमिका महत्त्वाची होती. केंद्र- राज्य संबंध, दक्षिणेकडील राज्यांवर होणारा अन्याय, हिंदी सक्तीला विरोध, त्रिभाषा सूत्र, विधेयके रोखून धरण्याच्या कृतीच्या विरोधात थेट राज्यपालांशी पंगा अशा विविध मुद्द्यांवर द्रमुकने भाजपशी सातत्याने दोन हात केले आहेत. द्रमुक, काँग्रेस किंवा विजय यांचा टीव्हीके या तिन्ही पक्षांची खरी लढाई ही खरेतर भाजपशीच आहे. पण हे तिन्ही पक्ष एकत्र येणे कठीण दिसते आहे. आम आदमी पार्टी आधीच ‘इंडिया आघाडीतू’न बाहेर पडली आहे. आता द्रमुकने काँग्रेसपासून अंतर राखण्याचा निर्णय घेतला आहे. उद्या आणखी पक्षदेखील ‘इंडिया आघाडी’तून बाहेर पडू शकतात. दक्षिणेतील कर्नाटक, तेलंगणा, केरळ या तीन राज्यांमधील सत्तेच्या बळावर काँग्रेसला आगामी लोकसभा निवडणुकीत यश मिळणे कठीण आहे. लोकसभेच्या जास्त जागा असलेल्या हिंदी पट्ट्यात काँग्रेस कमकुवत आहे. अशा वेळी मोठा भाऊ या नात्याने विरोधकांमध्ये योग्य समन्वय राखण्याची जबाबदारी काँग्रेसवर आहे. त्यामुळे ‘इंडिया आघाडी’ अधिक मजबूत करण्याकरिता काँग्रेसकडून प्रयत्न होणे अपेक्षित होते. पण तसे न होता या विधानसभा निवडणुकांनंतर आता उलट ‘इंडिया आघाडी’लाच तडे गेले आहेत. खरेतर लोकसभेच्या तीन निवडणुका लागोपाठ जिंकणाऱ्या भाजपला अजूनही देशात ४० टक्के मतांचा टप्पा गाठता आलेला नाही. पण भाजपविरोधातील सगळी मते विरोधकांमध्ये विभागली जातात. विरोधकांच्या मतांमधील ही फूट भाजपच्या पथ्यावरच पडते, असे आत्तापर्यंत अनेकदा असे दिसून आले आहे. त्यामुळे आताची ‘इंडिया आघाडी’तील दरी भाजपसाठी फायदेशीर ठरण्याचीच शक्यता आहे. देशभरात बहुतेक सगळ्या प्रादेशिक पक्षांची वासलात लागलेली असताना अशा परिस्थितीत विरोधकांच्या ‘इंडिया’ची इडा (नाडी) आता काँग्रेसच्याच हातात आहे. काँग्रेस उत्तरेत मजबूत झाला तर ती खऱ्या अर्थाने ‘इंडिया आघाडी’चे नेतृत्व करू शकेल आणि ही आघाडीही एकजुटीने भाजपला आव्हान देऊ शकेल. पण ते होणार का हा खरा प्रश्न आहे.

# संघर्षातून घडलेले व्यक्तिमत्त्व संपादक ज्ञानेश्वर डोईजड

जीवनात संघर्ष प्रत्येकाच्या वाट्याला येतो, पण त्या संघर्षाला जिद्दीने सामोरे जाऊन स्वत:चे वेगळे स्थान निर्माण करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे ज्ञानेश्वर डोईजड होय. अत्यंत साध्या परिस्थितीतून सुरू झालेला त्यांचा प्रवास आज अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. लहानपणापासूनच ज्ञानेश्वर डोईजड हे अभ्यासात अत्यंत हुशार होते. शिक्षणाची आवड, वाचनाचा छंद आणि काहीतरी मोठं करण्याची जिद्द त्यांच्या स्वभावात बालपणापासूनच होती. मात्र नियतीने लहान वयातच त्यांची कठीण परीक्षा घेतली. वडिलांचे छत्र हरपल्यामुळे संपूर्ण कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला. तीन बहिणींमध्ये एकमेव भाऊ असलेल्या ज्ञानेश्वर यांनी अतिशय जबाबदारीने परिस्थितीचा सामना केला. घरची परिस्थिती हलाखीची असतानाही त्यांनी कधीही शिक्षणाची साथ सोडली नाही. अनेक अडचणी, आर्थिक संकटे आणि संघर्ष यांचा सामना करत त्यांनी स्वत:चा मार्ग तयार केला. कष्ट, प्रामाणिकपणा आणि चिकाटी यांच्या जोरावर त्यांनी जीवनात प्रत्येक पायरी पार केली. एक काळ असा होता की, भांड्यावर नाव टाकण्यापासून सुरु झालेला त्यांचा संघर्ष आज पत्रकारिता क्षेत्रात मोठ्या जबाबदारीपर्यंत पोहोचला आहे. मेहनत आणि समाजाविषयीची तळमळ यांच्या बळावर त्यांनी स्वत:ची स्वतंत्र ओळख निर्माण केली. आज ते दैनिक श्रमिक लोकराज्य चे संपादक म्हणून कार्यरत आहेत आणि समाजातील सर्वसामान्य, श्रमिक व दुर्बल घटकांचा आवाज बुलंदपणे मांडत आहेत. त्यांच्या लेखणीतून समाजातील प्रश्नांना वाचा मिळते. सामान्य माणसाच्या न्यायासाठी लढण्याची ताकद त्यांच्या विचारांमध्ये दिसून येते. संघर्ष, संयम आणि सामाजिक बांधिलकी यांचे उत्तम उदाहरण म्हणजे ज्ञानेश्वर डोईजड.



**त्यांचा जीवनप्रवास हा केवळ यशाचा नाही, तर प्रतिकूल परिस्थितीवर मात करून उभं राहण्याचा आदर्श आहे. अनेक तरुणांनी त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन कठीण परिस्थितीतही हार न मानता पुढे जाण्याची शिकवण घ्यावी. वाढदिवसानिमित्त शुभेच्छा.. ! संपादक ज्ञानेश्वर डोईजड उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि पुढील वाटचालीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा! आपली लेखणी समाजासाठी अशीच प्रभावीपणे कार्य करत राहो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.**



- संकलन.
**माधव ससाणे**
दैनिक श्रमिक लोकराज्य तालुका प्रतीनिधी लोहा.
9921038721

# बिलोली तालुक्याचा इयत्ता दहावीचा निकाल सर्वाधिक- बी.एम.पाटील

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**कुंडलवाडी :** फेब्रुवारी मार्च 2026 मध्ये झालेल्या इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल हा नांदेड जिल्ह्यात बिलोली तालुक्याचा सर्वाधिक निकाल आहे अशी माहिती बिलोली प्रसाधन केंद्रीचे गटशिक्षणाधिकारी बी एम पाटील यांनी दिली . या वर्षीपासून राज्यात इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षासाठी कॉपी मुक्त अभियान राबविण्यात आले. विद्यार्थ्यांनी सीसीटीव्ही, बैठे पथकाच्या नजरेत परीक्षा देवून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. मार्च 2026 मध्ये झालेल्या इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत तालुक्यातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रमाण नांदेड जिल्ह्यात सर्वाधिक असल्याचे आज जाहीर झालेल्या निकालावरून स्पष्ट झाले आहे. तालुक्यातील एकूण 11 शाळेचा निकाल 100 टक्के लागलेला आहे. परीक्षेसाठी एकूण विद्यार्थी नोंदणी संख्या 2106, परीक्षेला बसलेली विद्यार्थी संख्या 2074, विशेष प्राविण्य विद्यार्थी संख्या 590, ग्रेड_1_पास -623, ग्रेड_2 पास_ 502, पास ग्रेड 199, एकूण पास 1914, उत्तीर्ण विद्यार्थी टक्केवारी 92.28% आहे. सर्व उत्तीर्ण विद्यार्थी, पालक, मार्गदर्शक शिक्षक व मुख्याध्यापक या सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन व कौतुक बिलोली गटसाधन केंद्राचे गटशिक्षणाधिकारी बी एम पाटील यांनी केले आहे.

# मातृत्वाला अनोखा सलाम : आकर्षक संदेशपत्रेही देण्यात आली

## चंदुकाका सराफ ज्वेल्सतर्फे ‘मदर्स डे’ चे भावस्पर्शी सेलिब्रेशन

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**नांदेड :** सुवर्ण परंपरेचा जवळपास दोन शतकांचा वैभवशाली वारसा जपणाऱ्या चंदुकाका सराफ ज्वेल्स यांनी यंदाचा ‘मदर्स डे’ अत्यंत आगळ्यावेगळ्या आणि भावनिक स्वरूपात साजरा करत मातृत्वाला अनोखा मानाचा मुजरा दिला. चंदुकाका सराफ ज्वेल्सच्या सर्व शोरूम्समध्ये आयोजित करण्यात आलेल्या विशेष उपक्रमांना कर्मचारी व ग्राहकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या विशेष उपक्रमांतर्गत शोरूममधील कर्मचारी व ग्राहकांना आपल्या आईविषयीच्या भावना व्यक्त करण्यासाठी आकर्षक संदेशपत्र देण्यात आले. कर्मचारी व ग्राहकांनी आपल्या हस्ताक्षरातून आईचे त्याग, प्रेम, संस्कार आणि प्रेरणा यांविषयी भावना व्यक्त करत मातृत्वाप्रती कृतज्ञता व्यक्त केली. अनेक भावनिक संदेशांनी संपूर्ण शोरूम परिसरात एक आपुलकीचे आणि संवेदनशील वातावरण निर्माण झाले होते.

### ग्राहकांचा प्रतिसाद प्रेरणादायी

**आई ही प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातील सर्वात मोठी शक्ती, प्रेरणा आणि आधार असते. तिच्याविषयी आदर आणि प्रेम व्यक्त करण्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. कर्मचारी व ग्राहकांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद आमच्यासाठी अत्यंत प्रेरणादायी आहे.**
**- सिद्धार्थ शहा, संचालक (चंदुकाका सराफ ज्वेल्स)**

### ज्येष्ठ ग्राहकांनीही केले उपक्रमाचे स्वागत

**शोरूममधील आकर्षक सजावट, भावनिक संदेश यामुळे हा उपक्रम विशेष ठरला. लहान मुलांपासून महिलांपर्यंत तसेच ज्येष्ठ ग्राहकांनीही या उपक्रमाचे मनापासून स्वागत केले. सामाजिक जाणीव आणि भावनिक नात्यांना जपणारे उपक्रम राबविण्यात नेहमीच पुढाकार घेणाऱ्या चंदुकाका सराफ ज्वेलर्सच्या या अभिनव संकल्पनेने ग्राहकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले आहे.**

# महापालिका आयुक्तांनी केली मान्सूनपूर्व नालेसफाईची पाहणी

## 31 मे पर्यंत सर्व कामे पूर्ण करण्याचे दिले कडक निर्देश

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**नांदेड :** मान्सूनपूर्व नालेसफाईची मोहीम सध्या प्रगतीपथावर असून नांदेड वाघाळा शहर महापालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी शनिवार (दि.९) शहरातील विविध भागांतील मान्सूनपूर्व नाले सफाई कामांची पाहणी केली आहे. पावसाळ्यात शहरात पाणी साचू नये आणि नैसर्गिक नाल्यातील पाण्याचा निचरा सुरळीत करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित यंत्रणेला दिले आहेत. याशिवाय खाजगी जागामालकांनी आपल्या क्षेत्रात रेखांकने विकसित करताना नैसर्गिक नाल्यांचा प्रवाह बदलला असल्यास अथवा अरुंद केला असल्यास त्याबाबत नगररचना विभाग व संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी तपासणी करून पावसाच्या पाण्याचा योग्यरीतीने निचरा होण्याच्या दृष्टीने नियमोचित कारवाई करण्याचे निर्देश यावेळी पालिका आयुक्तांनी दिले. तसेच ज्या ठिकाणी दरवर्षी पाणी साचते, अशा ‘ब्लॅक स्पॉट्स’वर विशेष लक्ष देऊन तिथे अतिरिक्त मनुष्यबळ आणि यंत्रणा तैनात करण्याच्या सूचना दिल्या. पावसामुळे पसरणाऱ्या जलजन्य आजारांना प्रतिबंधासाठी आरोग्य विभागाने पाणी साचणाऱ्या ठिकाणी धूर फवारणी आणि क्लोरिनेशन करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपायुक्त नितीन गाढवे, स्वच्छता विभागाचे स. आयुक्त मो. गुलाम सादिक, शहर अभियंता सुमंत पाटील, कार्यकारी अभियंता दिलीप टाकळीकर, क्षेत्रिय अधिकारी फरहतुल्ला बेग, रावण सोनसळे, वासिम तडवी आणि संबंधित प्रभागाचे स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते.



### ३१ मार्चपर्यंत सर्व कामे करावीत

**शहरातील मुख्य नाले, तसेच सखल भागातील सांडपाणी वाहिन्यांच्या सफाई कामांची पाहणी आयुक्तांनी केली. विशेषत: श्रावस्ती नगर, दुलेशहा रहेमान नगर खडकपुरा, सोमेश कॉलनी येथील भाजी मंडी, ण्णाभाऊ साठे पुतळा ते वसंतराव नाईक चौक नाला, मालटेकडी ब्रिज, बायपास सना इंटरनॅशनल स्कूल व मोहम्मद कॉलनी नाला येथील कामांवर आयुक्तांनी भेटी देवून, स्वच्छता केवळ वरवर न करता नाल्यांमधील संपूर्ण गाळ, कचरा काढून नाले पूर्णपणे मोकळे करण्याचे कडक आदेश त्यांनी संबंधित विभागाला दिले असून, ३१ मार्च पर्यंत ही कामे पूर्ण करावीत, अशीही तंबी त्यांनी दिली.**

# धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांच्या "कायापालट"चे 75 महिने पूर्ण

## "कायापालट"मधून ३७०० पेक्षा अधिक बेसहारांना नवजीवन

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**नांदेड :** तब्बल ७५ महिन्यांपासून संयोजक धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांच्या पुढाकारातून जगावेगळा उपक्रम सातत्याने सुरू असून, आतापर्यंत ३७०० पेक्षा अधिक बेसहारा, निराधार आणि मानसिकदृष्ट्या खचलेल्या व्यक्तींचा कायापालट करण्यात आला आहे. निराशेच्या गर्तेत अडकलेल्या काहींना रोजगार उपलब्ध करून दिला. या कार्याच्या अमृत महोत्सवी पर्वात अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून या उपक्रमाचे कौतुक केले.

नांदेड शहरात सोमवारी गोवर्धन घाट परिसरात एक वेगळंच दृश्य पाहायला मिळालं... ना राजकीय सभा, ना मोठा सत्कार, ना गाजावाजा... पण एका आरशासमोर बसलेल्या बेसहारा व्यक्तीच्या डोळ्यांत मात्र अनेक वर्षांनी चमक दिसत होती! केसांचा गुंता, वाढलेली दाढी, अंगावरची मळकट वस्त्रं आणि चेहऱ्यावर निराशेची राख... पण काही तासांतच तोच चेहरा स्वच्छ, नीटनेटका आणि आत्मविश्वासाने उजळलेला दिसला. हे शक्य झाले "कायापालट" या अनोख्या मानवतावादी उपक्रमामुळे!



**या उपक्रमाला हैदराबाद येथील सरोज व पुष्पराज जायस्वाल, नागपूरचे ॲड. अभय अवधीया आणि प्रवीण अवधीया यांनी सदिच्छा भेट देऊन दिलीप ठाकूर यांचे तोंड भरून कौतुक केले. उपक्रम संपल्यानंतर संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला. उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रभुदास वाडेकर, सुरेश शर्मा, अरुण काबरा आणि शिवा लोट यांनी विशेष परिश्रम घेतले.**
**शहरात अनेक कार्यक्रम होतात. पण काही कार्यक्रम केवळ बातमी राहत नाहीत — ते माणुसकीचा आरसा बनतात! "कायापालट" हा त्यापैकीच एक... जिथे फक्त चेहरा नाही, तर आयुष्य बदलण्याचा प्रयत्न केला जातो.**

या उपक्रमाला माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, खा. डॉ. अजित गोपछडे, भाजपा प्रदेश उपाध्यक्ष संजय कोडगे व ॲड. चैतन्य देशमुख, माजी पालकमंत्री डी. पी. सावंत, महानगराध्यक्ष अमर राजूरकर, जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे व ॲड. किशोर देशमुख, महापौर कविता मुळे, उपमहापौर दीपकसिंह रावत, स्थायी सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, सभागृह नेते ॲड. महेश कनकदंडे, जिल्हा सरचिटणीस विजय येवणकर, शीतल खांडील, विजय गंभीरे, सुषमा थोरात तसेच लायन्स उपप्रांतपाल योगेश जायस्वाल यांचे मार्गदर्शन लाभते. भाजपा नांदेड महानगर, लायन्स क्लब नांदेड सेंट्रल आणि अमरनाथ यात्री संघ यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम दरमहा राबविण्यात येतो.

या दिवशी दिलीप ठाकूर सह अनेक स्वयंसेवक अक्षरशः "देवदूत" बनले होते. स्वयंसेवक राजू अण्णा यांनी बेसहारांची कटिंग आणि दाढी करून त्यांना नव्या रूपात आणले. महेंद्र शिंदे यांनी स्वतः पुढे येत स्नान घातले, तर स्वच्छ पाण्याची व्यवस्था कामगार मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सुरेश लोट यांनी केली. दिलीप ठाकूर यांच्या तर्फे नवीन कपडे, चहा-फराळ आणि प्रत्येकाला १०० रुपयांची बक्षिसी देण्यात आली. स्नेहलता जायस्वाल यांनी गरमागरम खिचडी वाटप केली तर सुभाष बंग यांनी देवी बनियन देऊन सहकार्य केले. आरोग्याची विशेष काळजी घेत डॉ. अर्जुन मापारे आणि डॉ. दि. बा. जोशी यांनी मोफत तपासणी व औषधोपचार केले.

## जेष्ठ पत्रकार शेषेराव कंधारे यांचा राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारांता पुरस्काराने गौरव



श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**नायगाव :** नायगाव तालुक्यातील धुप्पा येथील जेष्ठ पत्रकार तथा दैनिक लोकपत्रचे नायगाव तालुका प्रतिनिधी शेषेराव लक्ष्मण कंधारे यांचा दि.१० मे रोजी बिड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारांता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

दैनिक लोकनेताच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात जगप्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने,अभिनेत्री मेघना झुझूम,बाप आयटी कंपनीचे संस्थापक रावसाहेब घुगे,डॉ.मयंक गांधी (संस्थापक GVT),जिल्हा शैल्य चिकित्सक डॉ.अशोक थोरात,जिल्हा परिषदेचे सीईओ जितीन रहेमान, पोलीस निरीक्षक नाचेन, नगराध्यक्षा पद्यश्रीताई धर्माधिकारी यांच्या हस्ते शाल.पुष्पहार सन्मान चिन्ह व सन्मानपत्र प्रदान करण्यात आले.

दैनिक लोकपत्रचे नायगाव तालुका प्रतिनिधी म्हणून कार्यरत असलेले शेषेराव कंधारे यांनी गेल्या अठरा वर्षापासून ग्रामीण भागातील सामाजिक, शैक्षणिक आणि जनहिताच्या प्रश्नांवर सातत्याने लेखणी चालवत पत्रकारितेत वेगळी ओळख निर्माण केली आहे. पत्रकार शेषेराव कंधारे यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत दैनिक लोकनेता परिवाराच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारांता पुरस्काराने त्यांचा गौरव करण्यात आला. राज्यस्तरीय मिळालेल्या या सन्मानाबद्दल सर्वच स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# लातूररोड जळकोट-मुखेड-बिलोली-बोधन रेल्वेमार्गासाठी निधी मंजुरीची मागणी

## लातूर जिल्हा रेल्वे प्रवासी संघाचे आ. अमित देशमुख यांना निवेदन

- २,४३० कोटींच्या ब्रॉडगेज प्रकल्पासाठी राज्य सरकारने ५० टक्के निधी द्यावा
- लातूरच्या विकासाला नवे पंख; रेल्वेमार्गामुळे व्यापार व यात्रेला चालना

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**लातूर :** लातूर रोड–मुखेड–बिलोली – बोधन या प्रस्तावित नवीन ब्रॉडगेज रेल्वेमार्गासाठी निधी मंजूर करून प्रकल्पाला गती द्यावी, अशी मागणी लातूर जिल्हा रेल्वे प्रवासी संघाच्या वतीने आमदार अमित देशमुख यांच्याकडे करण्यात आली. संघटनेचे अध्यक्ष आकाश कांबळे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने निवेदन सादर केले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, लातूर रोड ते बोधन दरम्यानच्या १३६ कि.मी. लांबीच्या नवीन ब्रॉडगेज रेल्वेमार्गाचे अंतिम स्थान सर्वेक्षण (FLS) पूर्ण झाले असून माती व खडक परीक्षणाचे काम सध्या प्रगत टप्प्यात आहे. या प्रकल्पासाठी अंदाजे २ हजार ४३० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. हा रेल्वेमार्ग जळकोट, मुखेड, चाकूर, नरसी, नायगाव, बिलोली आणि देगलूर या महत्त्वाच्या तालुक्यांना जोडणार असून मराठवाडा आणि तेलंगणा दरम्यान वाहतूक व संपर्क अधिक मजबूत होणार आहे. दक्षिण मध्य रेल्वेने जळकोट परिसरात ५ ते ३० फूट खोलीपर्यंत मातीचे नमुने गोळा करून ते तपासणीसाठी हैदराबाद येथे पाठवले असल्याची माहितीही निवेदनात देण्यात आली आहे.



**हा प्रकल्प नीति आयोगाच्या अखत्यारीतील महत्त्वाचा "मिसिंग लिंक" प्रकल्प मानला जात असून महाराष्ट्र व तेलंगणा सरकारकडून ५० टक्के खर्च वाटा मिळणे आवश्यक आहे. मात्र याबाबत अद्याप स्पष्टता नसल्याने प्रकल्प रखडण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.**

**या रेल्वेमार्गामुळे विशाखापट्टणम व कोकणातील जेएनपीटी बंदराशी थेट संपर्क निर्माण होणार असून रामागुंडम येथून कोळसा वाहतूक सुलभ होणार आहे. तसेच परळी, पंढरपूर, तुळजापूर, अक्कलकोट आणि कोल्हापूर या धार्मिक स्थळांशी थेट रेल्वे कनेक्टिव्हिटी निर्माण होऊन प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे.**

# विनयभंग प्रकरणातील आरोपीला नियमित जामीन

## बिलोली अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाचा निर्णय

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**देगलूर :** मरखेल पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा क्रमांक 58/2026 मधील आरोपी बालाजी मारोती तोटावार यास बिलोली येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने नियमित जामीन मंजूर केला आहे.मा.न्यायालयाने नुकताच हा आदेश पारित केला.

सदर प्रकरणात फिर्यादी महिलेच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहितेच्या कलम 75(2) अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला होता.आरोपीस अटक झाल्यानंतर त्याच्या वतीने नियमित जामीनासाठी अर्ज दाखल करण्यात आला. सुनावणीदरम्यान बचाव पक्षाने न्यायालयासमोर सविस्तर बाजू मांडली.

**न्यायालयाने आरोपीस पन्नास हजार रुपयांचा जामीन मंजूर केला असून,तपास यंत्रणेस आवश्यकतेनुसार सहकार्य करणे तसेच न्यायालयीन सुनावणीस नियमित उपस्थित राहण्याच्या अटी घालण्यात आल्या आहेत.सदर जामीन अर्जाच्या कामकाजात ॲड. अंकुशराजे जाधव व ॲड.सद्दाम शेख दावणगीरकर यांनी बाजू मांडली.**

सुनावणीदरम्यान बचाव पक्षाकडून ॲड.अंकुशराजे जाधव व ॲड.सद्दाम शेख दावणगीरकर यांनी आरोपीविरुद्ध करण्यात आलेले आरोप अतिशयोक्त व तथ्यहीन असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले.तसेच तपास पूर्णत्वाच्या टप्प्यात असून आरोपीचा कोणताही गुन्हेगारी पूर्वइतिहास नसल्याची बाबही न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून न्यायालयाने आरोपीस नियमित जामीन मंजूर केला.

हे वृत्तपत्र, मालक, प्रकाशक व संपादक **डोईजड ज्ञानेश्वर बालाजीराव** यांनी मुद्रक **सतिश विजय सोनवणे** यांच्या **यश प्रिंटर्स अँड पब्लिकेशन शिवाजी नगर नांदेड ता.जि. नांदेड (महाराष्ट्र) – ४३१६०२** येथे प्रकाशित केले.
E-MAIL - shramiklokrajya@gmail.com

**Daily Shramik Lokrajya,** Owner, Publisher & Editor **DOIJAD DNYANESHWAR BALAJIRAO,** Printer **SATISH VIJAY SONWANE**. Printed at **YASH PRINTERS & PUBLICATION HOUSE NO, 1-2-211, SHIVAJI NAGAR, NANDED**, Tq. Dist. **NANDED**, (Maharashtra) - 431602 M.S. & Published Near **AT POST. GAYATRI NAGAR, MUKHED TQ. MUKHED, DIST. NANDED-431715**
Email : shramiklokrajya@gmail.com

# सामाजिक बांधिलकी, प्रामाणिकपणा आणि सर्वसामान्यांप्रती असलेली आत्मीयता जपणारे व्यक्तिमत्व

## बेटमोगरेकर परिवाराचे समर्थक

# इरफान मोमिन



12 मे

संकलन
ज्ञानेश्वर डोईजड
संपादक, दैनिक श्रमिक लोकराज्य

## वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!

मुखेड परिसरात सामाजिक बांधिलकी, प्रामाणिकपणा आणि सर्वसामान्यांप्रती असलेली आत्मीयता यामुळे ओळख निर्माण करणारे युवा व्यक्तिमत्त्व इरफान मोमिन यांचा आज वाढदिवस उत्साहात साजरा होत आहे. या निमित्ताने विविध क्षेत्रातील मान्यवर, मित्रपरिवार व नागरिकांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

माजी आमदार हनमंतराव पाटील बेटमोगरेकर तसेच माजी जिल्हा परिषद अध्यक्ष दिलीपराव पाटील बेटमोगरेकर यांचे कट्टर समर्थक म्हणून इरफान मोमिन यांची संपूर्ण परिसरात ओळख आहे. राजकीय व सामाजिक क्षेत्रात कार्य करत असताना त्यांनी नेहमीच निष्ठा, संयम आणि बांधिलकी जपली आहे. नेतृत्वावरील विश्वास कायम ठेवत त्यांनी अनेक सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवला आहे.

अत्यंत मेहनती, कष्टाळू आणि जिद्दी युवा म्हणून इरफान पठाण यांचे नाव आदराने घेतले जाते. स्वतःच्या मेहनतीच्या जोरावर त्यांनी "इरफान सेवा केंद्र" या ऑनलाईन सेवा केंद्राच्या माध्यमातून स्वतःचा व्यवसाय उभा केला. आज त्यांच्या सेवा केंद्रामार्फत अनेक नागरिकांची विविध शासकीय व खासगी कामे सुलभपणे पूर्ण होत असून, सामान्य नागरिकांना योग्य मार्गदर्शन मिळत आहे.

गोरगरीब, गरजू आणि अडचणीत सापडलेल्या लोकांच्या मदतीला धावून जाणारे व्यक्तिमत्त्व म्हणूनही त्यांची विशेष ओळख निर्माण झाली आहे. एखाद्या नागरिकाला शासकीय कागदपत्रे, ऑनलाईन प्रक्रिया किंवा अन्य कामांमध्ये अडचण निर्माण झाल्यास इरफान पठाण हे तत्परतेने मदत करतात. त्यामुळे अनेक कुटुंबांचा ते विश्वासू चेहरा बनले आहेत.

समाजामध्ये काम करताना त्यांनी कधीही मोठेपणा न मिरवता सर्वसामान्य माणसाशी जिव्हाळ्याचे नाते जपले.

**मित्रपरिवार, युवक आणि नागरिकांना सोबत घेऊन सामाजिक सलोखा कायम ठेवण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले आहे. त्यांच्या साध्या राहणीमानामुळे आणि मनमिळावू स्वभावामुळे त्यांना समाजातील सर्व स्तरातून प्रेम मिळत आहे.**

**आज वाढदिवसानिमित्त त्यांच्या पुढील आयुष्यास उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, सुख-समृद्धी आणि सामाजिक कार्यात अधिक यश लाभो, हीच सर्वांकडून शुभेच्छा व्यक्त होत आहेत.**

---

## मोदींचे आवाहन, सरकारचे अपयश

# सरकार जनतेपासून वास्तव लपवत आहे का? - डॉ. श्रावण रॅपनवाड

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**मुखेड:** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जागतिक परिस्थिती आणि संभाव्य युद्धजन्य संकटाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना सोन्याची खरेदी टाळण्याचे, पेट्रोल-डिझेलचा कमी वापर करण्याचे तसेच अनावश्यक परदेश प्रवास टाळण्याचे आवाहन केल्याची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात सुरू आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस प्रदेश सरचिटणीस डॉ श्रावण रॅपनवाड यांनी केंद्र सरकारवर गंभीर टीका केली आहे.

डॉ. श्रावण रॅपनवाड यांनी म्हटले आहे की, मोदी सरकारच्या चुकीच्या धोरणामुळेच देशावर मोठे आर्थिक संकट येण्याची शक्यता आहे. लाखो-कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी, चुकीचे आर्थिक निर्णय आणि वाढती महागाई यामुळे सामान्य नागरिक त्रस्त झाला आहे. आता परिस्थिती हाताबाहेर जात असल्याने सरकार जनतेला सावध राहण्याचे आवाहन करत आहे."

त्यांच्या मते, सरकारने अनेक वर्षे विकासाच्या नावाखाली मोठमोठ्या घोषणा केल्या; मात्र प्रत्यक्षात बेरोजगारी, महागाई आणि आर्थिक अस्थिरता वाढत गेली. जनतेचे लक्ष मूळ प्रश्नांकडून हटवण्यासाठी युद्धजन्य वातावरणाचे कारण पुढे केले जात आहे का?असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.



**डॉ श्रावण रॅपनवाड यांनी पुढे सांगितले की, पेट्रोल-डिझेलचे वाढते दर, रुपयाची घसरती किंमत आणि बाजारातील अनिश्चितता यामुळे सामान्य कुटुंबांचे आर्थिक गणित आधीच कोलमडले आहे. अशा परिस्थितीत सरकारने स्पष्ट भूमिका घेऊन देशाच्या आर्थिक स्थितीबाबत पारदर्शक माहिती द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. एकीकडे सरकारी खर्चात कसलीच कपात न करता उधळपट्टी करता आणि जनतेला मात्र बचतीचे आवाहन करणे म्हणजे जगा सांगे ब्रह्मज्ञान या उक्तीत बसणारे आहे असे मत डॉ श्रावण रॅपनवाड व्यक्त केले. त्यांच्या मते चुकीचे आर्थिक नियोजन, जागतिक अस्थिरता आणि आर्थिक दबाव यामुळे केंद्र सरकारसमोर हे मोठे आव्हान उभे राहिले आहे. मात्र या संकटाचा सामना करण्यासाठी केवळ आवाहने नव्हे, तर योग्य व ठोस आर्थिक धोरणे आणि जनतेचा विश्वास जपणारी भूमिका आवश्यक आहे.**

---

## किशनराव बसवंते यांचा महाराष्ट्र लोक भूषण पुरस्काराने गौरव

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**नायगाव :** नांदेड येथील नमस्कार चौक गजानन नगर सोसायटी येथील सेवानिवृत्त आदर्श शिक्षक किशनराव नारायण बसवंते यांचा दि.१० मे रोजी  परळी वैजनाथ येथील हॉटेल भागवत पॅलेस मध्ये मान्यवरांच्या हस्ते राज्यस्तरीय महाराष्ट्र लोक भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

दैनिक लोकनेताच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात जगप्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने,अभिनेत्री मेघना झुझम,बाप आयटी कंपनीचे संस्थापक अध्यक्ष घुगे,डॉ.मयंक गांधी (संस्थापक GVT),जिल्हा शैल्य चिकित्सक डॉ.अशोक थोरात,जिल्हा परिषदेचे सीईओ जितीन रहेमान,पोलीस निरीक्षक नाचेन, नगराध्यक्षा पद्मश्रीताई धर्माधिकारी, दैनिक लोकनेता चे संपादक ज्ञानेश्वर मुंढे यांच्या हस्ते शाल.पुष्पहार सन्मान चिन्ह व सन्मानपत्र देऊन प्रदान करण्यात आले.



किसनराव बसवंते हे एक व्यक्तिमत्व आदर्श शिक्षक म्हणून सर्वत्र परिचित होते त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांनी सामाजिक कार्यात पूर्वीपासूनच अग्रेसर राहिले आहेत यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत

दैनिक लोकनेता परिवाराच्या वतीने दिला जाणारा राज्य स्तरीय महाराष्ट्र लोक भूषण पुरस्काराने त्यांचा गौरव करण्यात आला. राज्यस्तरीय मिळालेल्या या सन्मानाबद्दल सर्वच स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

---

## मुखेड येथे हिंदू शिरोमणी महाराणा प्रताप सिंह जयंती उत्साहात साजरी

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**मुखेड :** हिंदवी स्वाभिमान, शौर्य, पराक्रम आणि राष्ट्रनिष्ठेचे प्रतीक असलेल्या हिंदू शिरोमणी महाराणा प्रताप सिंह जी यांची ४८६ वी जयंती मुखेड येथे दिनांक ०९ मे २०२६ रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी महाराणा प्रताप यांच्या जीवनकार्याचा गौरव करत त्यांच्या शौर्यगाथेचे स्मरण केले. मातृभूमीच्या रक्षणासाठी त्यांनी दिलेले योगदान, स्वाभिमानासाठी केलेला संघर्ष आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा आजच्या पिढीने घेण्याची गरज असल्याचे वक्त्यांनी सांगितले.



यावेळी आरुणसिंह राजासिंह चौव्हाण, कोंडीबा बेळीकर, जयभीम सोनकांबळे, संजय बनसोडे, किशन पाटील, स्वप्निलसिंह चौव्हाण, शिवा जाधव, संजय मेथे, वीर सिंह ठाकुर, अनिकेत बनसोडे, विशाल राठोड, सौरभ बेळगे यांच्यासह अनेक नागरिक व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# कु.कल्याणी पद्माजय कोनाळे हिस दहावी परीक्षेत शंभर टक्के गुण

## ऐतिहासिक कामगिरीसह जिल्हयात सर्वप्रथम येण्याचा बहुमान

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**नांदेड :** येथील पूर्णा रोड भागातील ज्ञानभारती विद्या मंदिर ची विद्यार्थिनी कु. कल्याणी पद्माजय कोनाळे हीने इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत शंभर टक्के गुण मिळवत गुणवत्तेचा ऐतिहासिक उच्चांक नोंदविला आहे कु. कल्याणी कोनाळे ही अगदी पहिल्या वर्गापासूनच हुशार विद्यार्थिनी म्हणून वर्गात प्रथम क्रमांकासह उत्तीर्ण होत आलेली असून तिने आपल्या गुणवत्तेचा आलेख कायम उंचावत ठेवत दहावी बोर्ड परीक्षेत ५०० पैकी ५०० गुण मिळवून ऐतिहासिक कामगिरी करत 100% गुण प्राप्ती केली आहे

इयत्ता दहावी परीक्षा फेब्रुवारी 2026 चा निकाल मागील आठवड्यात जाहीर करण्यात आला यात कु.कल्याणी कोनाळे हीने इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत शंभर टक्के गुण मिळवून उत्कृष्ट यश संपादन केल्याबद्दल तिचे सर्व स्तरातून मनःपूर्वक अभिनंदन  करण्यात येत आहे तिच्या या यशाबद्दल पेशाने शिक्षक असलेले तिचे वडील पद्माजय कोनाळे यांनी तिच्या यशाचे श्रेय हे कु.कल्याणी हिच्या मेहनतीचे, जिद्दीचे आणि चिकाटीचे हे सुंदर फळ आहे. तिने आमचे कुटुंब, तिचे शिक्षक आणि शाळेचा अभिमान वाढवला आहे अशी बोलकी प्रतिक्रिया यावेळी दिली . पुढे त्यानी तिचे अभिनंदन करतांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आणि अशीच प्रगती करत रहा आणि आयुष्यात मोठे यश मिळवा असा आर्शिवादही व्यक्त केला आहे.